# नायक्स ट्युटोरिअल्स

Way to Excellence

वर्षे : २०२५-२०२६ | सराव प्रश्नपत्रिका क्र – ३ | गुण : ८०

इयत्ता : १० वी | मराठी अक्षरभारती | वेळ : ३ तास

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

(१) सूचने नुसार कृती व व्याकरण कृती यामधील आकृत्या काढाव्यात .

(२) आकृत्या पेनानेच काढाव्यात .

(३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना,निवेदन इ . ) आकृतीची आवश्यकता नाही . तसेच या कृती उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहून काढू नयेत .

(४) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे .

## विभाग १: पठित गदय

प्रश्न .१) अ) उताऱ्याच्या आधारे सूचने नूसार कृती करा .

(१) कोण ते लिहा . २

अ) सभा संमेलने गाजवणारे कवी □

ब) विश्वकोशाचे अध्यक्ष या नात्याने वाईला जाणारे □

क) लेखकाचा शाल देऊन गौरव करणारे □

ड) मासे पकडण्याचा उदयोग करणारी □

एकदा मी पु. ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईंना मला थांबवले व विचारले, "तुम्हांला शाल दिली तर चालेल काय?"

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु.ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित'शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, "त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस." या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे."

(आ) कारणे लिहा . २


१) बाळ रडत होते कारण .........

३) लेखकाने सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली कारण .........

(इ) स्वमत लिहा – "शाल व शालीनता " यांच्या पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेल्या अर्थ स्पष्ट करा . ३

प्रश्न .२) अ)खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .

(१) शब्दजाल पूर्ण करा . २



निरंजनची गुरूजींवर अपार श्रद्धा होती. तसं गुरुजींचंही निरंजनवर खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता, कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच. दूरदूरच्या नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा. गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला – 'रडत बसू नको. शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरूजींवर श्रद्धा ठेवायला आणि परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या–पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरूजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.

आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खुश होता. नागरिकांची कर्तव्ये कोणती ? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे ? लोकसभा म्हणजे काय ? ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो ? साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती. अभ्यास करता करता किती वेळ लोटला कुणास ठाऊक. निरंजन ताडकन उठून उभा राहिला. नऊ वाजून गेले होते. साडेदहाची परीक्षा. त्याआधी देशमुखांकडे जायचं होतं. केवढंतरी लांब चालायचं होतं. भराभर आवरून तो निघाला.

(आ)दिलेल्या पर्यायातून योग्य पर्यायाची निवड करून वाक्य पुन्हा लिहा . २

१) नागरिकशास्त्राचा अभ्यास करताना निरंजन खुश होता कारण . . . . . . .

(क) नागरिकशास्त्राचा पेपर शेवटचा होता . (ख) आधीचे सगळे पेपर सोपे गेले होते .

(ग) नागरिकशास्त्रा निरंजनचा आवडीचा विषय होता (घ) सर्व प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती

२) निरंजन भडसावळे गुरूजींचा लाडका विदयार्थी होता कारण . . . . . . . .

(क) निरंजन अनाथ होता . (ख) निरंजनची गुरूजींवर अपार श्रद्धा होती .

(ग) निजंजन अतिशय प्रामाणिकपणे काम करायचाा आणि अभ्यासही .


(घ) तो शाळेत सर्वांशी जमवून घेत असे .

(इ) स्वमत लिहा – अभ्यास चांगला होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी लिहा . ३

अपठित गदय

प्रश्न .३) अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .

(१) खालील आकृती पूर्ण करा . २




मानवी जीवन सुखदु:खाने भरलेले आहे, किंबहुना जीवनात 'सुख पाहता जवापाडे दु:ख पर्वताएवढे' असते. विनोदाच्या या महान देणगीमुळे माणसाला जगणे सुसह्य होते. विनोद हा मानवी जीवनातील दु:ख सुसह्य करण्यास मदत करतो, तो माणसांचे दोष दाखवितो. तसाच माणसांचा चांगुलपणाही मान्य करतो, सुधारण्याची संधी देण्यासाठी मदत करतो. उत्तम विनोद हा समाजातील उच्च संस्कृतीचा निदर्शक आहे. विनोद माणसांना खदाखदा हसवून त्यांच्या दैनंदिन जीवनातील ताण कमी करतो. 'हसा आणि निरोगी बना' असा संदेश देतो. तो मानवतेवर प्रेम करतो व हसता हसता शिक्षण देतो. विनोद माणसांना 'आत्मपरीक्षण' करण्यास भाग पाडतो. मात्र विनोदाला 'दाद' देण्यासाठी अंगी खिलाडूवृत्ती असली पाहिजे.

(२) दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायाची निवड करून वाक्य पुन्हा लिहा. २

१) उत्तम विनोद हा समाजतील उच्च ....... चा निदर्शक असतो.
(प्रगती, विकृती, स्वीकृती, संस्कृती)

२) विनोद माणसांना ........ करण्यास भाग पाडतो.
(निरीक्षण, आत्मपरिक्षण, टीकात्मक दर्शन, दोष दिग्दर्शन)

## विभाग २ – पदय

प्रश्न.४)अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

१) खालील आकृतिबंध पूर्ण करा. २

(१) [ ] — संत एकनाथांनी सांगितलेले पाण्याचे दोन गुण — [ ]

(२) [ ] — योगी पुरूषाची दोन महत्वाची वैशिष्टे — [ ]

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी। पांखोवा जेवीं पिलियांसी।
जीवन जैसे कां जीवांसी। तेवीं सर्वांसी मृदुत्व।।
जळ वरिवरी क्षाळी मळ। योगिया सबाह्य करी निर्मळ।
उदक सुखी कर एक वेळ। योगी सर्वकाळ सुखदाता।

उदकाचें सुख तें किती। सवेंचि क्षणें तृषितें होती।
योगिया दे स्वानंदतृप्ती। सुखासी विकृती पैं नाही।।
उदकाची जे मधुरता। ते रसनेसीचि तत्त्वतां।।
योगियांचे गोडपण पाहतां। होय निववितां सर्वेंद्रियां।।

मेघमुखें अध:पतन। उदकाचें देखोनि जाण।
अध:पातें निवती जन। अन्नदान सकळांसी।।
तैसे योगियासी खालुतें येणें। जे इहलोकीं जन्म पावणें।
जन निववी श्रवणकीर्तनें। निजज्ञानें उद्धरी।।

२) खालील चौकटी पूर्ण करा. २

(१) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी – [ ]

(२) पिलांना सुरक्षितता देणारे – [ ]

(३) चिरकाल टिकणारा आनंद – [ ]

(४) व्यक्तीला सदैव सुख देणारा – [ ]

(३) खालील शब्दांसाठी केवितेतील समानार्थी शब्द लिहा. २

१) जीभ २) पाणी ३) ढग ४) गोडपणा

(४) योगी पुरूषांच्या जन्माबाबत संत एकनाथांनी मांडलेले विचार तुमच्या शब्दात लिहा. २

प्रश्न.५)अ) खालील पैकी कोणत्याही एका कवितेवर दिलेल्या मुददयांच्या आधारे कृती करा. ८

कविता : औक्षण□रंग मजेचे रंग उदयाचे

(१) कवितेच्या कवी□कवयित्रीचे नाव लिहा. १

(२) कवितेचा विषय तुमच्या शब्दात लिहा. १

(३) कवितेतील ओळींचा सरळ अर्थ लिहा. २

अशा असंख्य ज्योतींची तुझ्यामागुन राखण दिनदुबळयांचे असे तुला एकच औक्षण

किंवा

हिरवी हिरवी मने भोवती , किती छटा हिरव्याच्या गर्भरेशमी सळसळण्याची जगास सांगू गोष्टी

(४) कवितेतून मिळणारा संदेश तुमच्या शब्दात लिहा . २

(५) शब्दांचे अर्थ लिहा . २

१) द्रव्य २) सामार्थ्य ३) जिद्द ४) राखण


किंवा

१) दृष्टी २) वृष्टी ३) दाट ४) पुष्टी

## विभाग ३ : स्थूलवाचन

प्रश्न .६) खालील पैकी कोणत्याही दोन कृती सोडवा . ६

(१) 'आधी केले मग सांगितले' या उक्तीची यथार्थता तुम्ही अभ्यासलल्या पाठाच्या आधारे स्पष्ट करा .

(२)  व  या प्रतिकांचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा .

(३) माहीती लिहा .

सग्वारो कॅक्टस

सग्वारो कॅक्टसचे दिसणे | सग्वारो कॅक्टसचे उपयोग

## विभाग ४ – भाषाभ्यास

प्रश्न .७) अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती . २

(१) वाक्यांचे प्रकार ओळखा .

१) माझी शाळा घरा जवळ आहे .

२) शिस्तीने वागा

(२) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतार कारा . २

१) अब्दुलमियांची ही समाजसेवा फार मोठी आहे . (नकारार्थी वाक्य करा)

२) पांढरा रंग कोणाला आवडत नाही ☐(विधानार्थी वाक्य करा)

(३) वाक्य प्रचाराचा अर्थसांगून वाक्यात उपयोग करा . (फक्त २) ४

क) हात दाखवून अवलक्षण ख) सुरूंग लावणे घ) अंगाचा तिळपापड होणे

आ) भाषासौंदर्य :

१)(१) खालील शब्दसमूहा बद्दल एक शब्द लिहा . १

(अ) केलेले उपकार जाणणारा –

(आ) केलेले उपकार विसरणारा –

(२) खालील शब्दांसाठी योग्य समानर्थी शब्द लिहा . १

(अ) सही – (आ) प्रशंसा –

(३) खालील शब्दांसाठी योग्य विरूद्धार्थी शब्द लिहा . १

(अ) अप्रामाणिक ☐ (आ) हळूहळू ☐

(४) वचन बदला . १

(अ) गाडी – (आ) जग –

२) लेखननियमांनुसार २

अचुक शब्द ओळखा .

(१) सात्त्वीक□सात्वीक□सात्‌विक□सात्त्विक


(२) दैनंदीन□दैनंदिन□दैणदीन□दैनंदिण

३) वाक्यातील विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा . २

| वाक्य | विरामचिन्हाचे नाव |
|---|---|
| (१) अरे, पण चिठ्ठी मराठीतून आहे . | (अ) (ब) |
| (२) "अन्वर जेवला □" | (अ) (ब) |

विभाग ५ – उपयोजित लेखन

प्रश्न .८)अ)(१) खालील विवेदन वाचा व दिलेल्या कृतीपैकी एक कृती सोडवा . ६




किंवा

(२) विभाग १ गदय कृती मधील 'इ' अपठित गदय उताऱ्याचे एक तृतीयांश शब्द मर्यादित सारांश लेखन खरा .

प्रश्न .९) खालील कोणत्याही दोन कृती सोडवा . १०


१) विदयार्थांना आवश्यक असणाऱ्या,बाजारात नव्यानेच आलेल्या बॉलपेनची आकर्षक जाहिरात तयार करा . ५

२) तुमच्या शाळेत झालेल्या वाचन प्रेरणा दिनाची बातमी तयार लिहा . ५

३) 'करावे तसे भरावे' या कथाबाजीवरून कथालेखन करा . ५

प्रश्न .१०) खालील पैकी एका विषयावर लेखन करा . (१०० ते १२० शब्द) ८

१) प्रसंग लेखन



२) आत्मकथा

- शेतकऱ्याचे मनोगत
  - सगळं पावसावर अवलंबून
  - पहिला पाऊस
  - आकाशाकडे डोळे
  - लहरी पाऊस
  - काळी आई, थोडी जमीन

३) वैचारिक

वाचाल, . . . . . तर वाचाल !

वाचनाचे महत्त्व

वाचनाचे फायदे

वाचन कला प्रयत्न साध्य

वाचन छंद

****__________****